**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्य घटनेतून मिळालेल्या मार्गदर्शनामुळेच देशाला गौरवशाली वाटचाल करणं शक्य झाल्याचं प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला देशाला केलेल्या संबोधनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन

- मारुती चित्तमपल्ली, चैत्राम पवार, विलास डोंगरे यांच्यासह अनेक मान्यवरांचा पद्म पुरस्काराने गौरव

- सैन्यातल्या दोघांचा किर्ती चक्र आणि १४ जणांचा शौर्य चक्र देऊन गौरव

- प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी देशभर जय्यत तयारी, इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो प्रमुख पाहुणे

**आणि**

- ऑस्ट्रेलियन खुली टेनिस स्पर्धा जिंकून अमेरिकेची मॅडिसन कीजच्या खात्यात पहिलेच ग्रँडस्लॅम पदक जमा

**<><><><><>**

आपल्या देशाची गौरवशाली वाटचाल राज्यघटनेतून मिळालेल्या मार्गदर्शनाशिवाय शक्य झाली नसती असे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी म्हटले आहे. राष्ट्रपतींनी आज प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला देशवासियांना संबोधित केले

त्यावेळी त्या बोलत होत्या. भारतीय म्हणून आपली राज्यघटना ही आपल्या सामूहिक अस्मितेचा मूलभूत आधार आहे असे त्या म्हणाल्या.

**होल्ड बाईट - संविधान**

गेली ७५ वर्षे राज्यघटनेने आपल्या प्रगतीचा मार्ग प्रशस्त केला आहे. बाबासाहेब आंबेडकर, संविधान सभेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष, इतर मान्यवर सदस्य, राज्यघटना निर्मितीशी संबंधित विविध अधिकारी आणि इतरांच्या मेहनतीमुळे ही महान घटना आपल्याला लाभली, हा दिवस या सगळ्यांचे आभार मानण्याचा दिवस आहे. असे त्या म्हणाल्या.

यावेळी राष्ट्रपतीनी केंद्र सरकार लोककल्याण आणि देशाच्या विकासासाठी करत असलेल्या विविध कामांविषयी देशवासियांना सांगितलं. यामुळे भारताच्या प्रजासत्ताकाच्या ७५ वर्षांच्या दीर्घ कालखंडात भारताचा सुप्त राहिलेला आत्मा आता पुन्हा जागृत झाला असल्याचं त्या म्हणाल्या.

केंद्र सरकारने धाडसी दूरदृष्टीने निर्णय घेतले आहेत. नव्याने आणलेले फौजदारी कायदे हा सर्वात उल्लेखनीय निर्णय आहे. या कायद्यांमधून शिक्षेपेक्षा न्याय देण्याची भावना फौजदारी न्यायव्यवस्थेच्या केंद्रस्थानी ठेवली गेली आहे असं त्या म्हणाल्या. देशात एकाच वेळी निवडणुका घेण्याचे संसदेत मांडण्यात आलेल्या विधेयकामुळेही प्रशासनातील सातत्य वाढू शकते, धोरण लकवा कमी होऊ शकतो, संसाधांचा पुरेपूर वापर करण्याची संधी मिळेल आणि वित्तीय भार कमी होऊ शकेल असे त्या म्हणाल्या.

आपली भाषिक विविधता आणि वारसा जपण्यासाठीही केंद्र सरकार काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट - भाषा**

आजची युवा पिढीच उद्याचा भारत घडवणार आहे. त्यामुळेच त्यांच्या प्रतिभेला वाव देण्याकरता सरकारने शिक्षणातली गुंतवणूक वाढवली असल्याचे त्यांनी सांगितले..

राजकीय तसेच वैयक्तिक अशा आपल्या सर्वच व्यवहांरात नैतिकतेला सर्वोच्च स्थान देणे हेच आपल्या आपल्या संस्कृतीचे सार असल्याचे सांगत, प्रत्येकाप्रती करुणाभाव बाळगण्याचा संदेश महात्मा गांधी यांनी आपल्याला दिला होता. या संदेशाचा अवलंब करण्याचा संकल्प आपण आजच्या दिवशी करूया असे आवाहनही राष्ट्रपतींनी यावेळी केले.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं आज पद्म पुरस्कारांचीही घोषणा केली. त्यात ज्येष्ठ लेखक मारुती चित्तमपल्ली, पर्यावरणवादी कार्यकर्ते चैत्राम पवार आणि नागपूरचे होमिओपॅथी डॉक्टर विलास डांगरे यांचा समावेश आहे.
माहेश्वरी हॅडलूमसाठी कार्यरत सॅली होळकर, ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्त्या राधा भट, कर्नाटकातले ज्येष्ठ गोंधळी गायक वेंकप्पा सुगतेकर, निरगुण गायक भेरु सिंग चौहान यांच्यासह विविध मान्यवरांचा यात समावेश आहे.

**<><><><><>**

७६ व्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सशस्त्र दल आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या ९३ जवानांना तसंच ११ शहीद जवांनाना शौर्य पुरस्कार जाहीर केले आहेत. यात मेजर मनजित यांना किर्ती चक्र जाहीर झालं आहे. नाईक दिलावर खान यांनाही मरणोत्तर किर्तीचक्र जाहीर झालं आहे. मेजर आशीष दहिया, मेजर कुणाल, मेजर सतींदर धनकर, असिस्टंट कमांडंट

एशेन थंग किकॉन, सुभेदार विकास तोमर, सुभेदर मोहन राम, हवालदार प्रकाश तमंग, फ्लाईट लेफ्टनंट अमनसिंह हंस, कॉर्पोरल दाबी संजय हिफाबाई एस्सा, डेप्युटी कमांडंट विक्रांत कुमार, इन्स्पेक्टर जेफ्री हमींगचुलो यांना शौर्य चक्र जाहीर झाले आहेत. कॅप्टन दीपक सिंग, हवालदार रोहित कुमार आणि विजयन कुट्टी यांना मरणोत्तर शौर्य चक्र जाहीर झाले आहेत.

**<><><><><>**

प्रजासत्ताक दिनी होणाऱ्या मुख्य सोहळ्यात पोलिस, गृहरक्षक दल, अग्निशमन, आणि नागरी सेवांसह इतर सुरक्षा सेवांमधल्या ९४२ कर्मचाऱ्यांना विविध पदकं प्रदान केली जाणार आहेत. यापैकी, ९५ कर्मचाऱ्यांना आपल्या अतुलनीय शौर्याबद्दल शौर्य पदकांनी सन्मानित केलं जाईल. १०१ कर्मचाऱ्यांना राष्ट्रपती पदकं तर ७४६ कर्मचाऱ्यांना उल्लेखनीय सेवा पदकं बहाल केली जाणार आहेत.

महाराष्ट्रातल्या एकूण ४३ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रजासत्ताक दिनानिमित्त पुरस्कार जाहीर झाले आहेत. हवाई दलातले स्क्वाड्रन लीडर प्रथमेश डोंगरे यांना वायुसेना शौर्य पदक जाहीर झाला आहे. याशिवाय कॉर्पोरल विकी पहाडे यांना मरणोत्तर वायुसेना शौर्य पदक मिळणार आहे.

रविंद्र कुमार सिंगल, दत्तात्रय कारळे, सुनील फुलारी आणि रामचंद्र केंडे या पोलीस अधिकाऱ्यांना राष्ट्रपती विशिष्ट सेवा पदक जाहीर झालं आहे. याशिवाय कारागृह सेवेतल्या ५ जणांना उत्कृष्ट सेवेसाठी पुरस्कार जाहीर झाले आहेत. त्यात विवेक झेंडे, अहमद मनेर, गणेश गायकवाड, तुळशीराम गोरवे यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्यासह देशभर सर्वत्र चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. नवी दिलीत कर्तव्य पथ इथं प्रजासत्ताक दिनानिमित्त उद्या

होणार असलेल्या संचलनाची तयारी पूर्ण झाली आहे. संविधान स्वीकृतीची ७५ वी वर्षपूर्ती आणि लोकसहभाग यावर उद्याच्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमांमध्ये भर देण्यात आला आहे. इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियंतो उद्याच्या संचलन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. भारताच्या सशस्त्र दलांसोबत इंडोनेशियाची १६० सदस्यीय संचलन तुकडी आणि १९० सदस्यीय बँड पथक या संचलनात सहभागी होणार आहे. प्रजासत्ताक दिनाच्या संचलन सोहळ्यापूर्वी प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी सकाळी राष्ट्रीय युद्ध स्मारक इथं पुष्पहार अर्पण करतील.नंतर कर्तव्य पथावर सशस्त्र दलांसह विविध पथकांच्या शानदार संचलनाची मानवंदना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू स्वीकारतील. येत्या २९ जानेवारी रोजी विजय चौक इथं होणाऱ्या बीटिंग द रिट्रीट सोहळ्याने प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमांची सांगता होणार आहे.

दरम्यान, इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियंतो यांचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपती भवनात आज औपचारिक स्वागत केलं. यावेळी सुबियंतो यांना गार्ड ऑफ ऑनरनं सन्मानित करण्यात आलं. प्रधानमंत्री मोदी आणि सुबियंतो दोन्ही देशांमधले परस्पर संबंध आणि द्विपक्षीय हिताच्या मुद्द्यांवर चर्चा करणार आहेत. या चर्चेनंतर दोन्ही देशांमध्ये अनेक करारांवर स्वाक्षऱ्या होणार आहेत.

**<><><><><>**

प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संचलनात सहभागी होणारे राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, आदिवासी अतिथी आणि चित्ररथ कलाकारांशी आज अनौपचारिक संवाद साधला. राष्ट्रीय एकात्मता आणि विविधतेवर यावेळी त्यांनी भर दिला. संचलन सोहळ्यातल्या

सहभागीनी ‘एक भारत श्रेष्ठ भारत’ संकल्पनेला बळकटी देण्यासाठी निरनिराळ्या राज्यातल्या जनतेशी संवाद साधण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांच्यात आज द्विपक्षीय आणि शिष्टमंडळ स्तरावर चर्चा झाली. दोन्ही देशांनी संरक्षण क्षेत्राअंतर्गत परस्पर  सहकार्याचा विस्तार करायचा निर्णय घेतला अशी माहिती प्रधानमंत्र्यांनी या चर्चेनंतर दिली. याअंतर्गत दोन्ही भारत आणि इंडोनेशिया संरक्षण उत्पादन आणि पुरवठा साखळीत एकत्र काम करण्याच्या दिशेनं वाटचाल करतील, असं त्यांनी सांगितलं.

सुबियांतो यांनी देखील त्यांच्या या पहिल्याच राजनैतिक भेटीत भारतानं दिलेल्या सन्मानाबद्दल आभार व्यक्त केले. दोन्ही देशांमध्ये परस्पर सहकार्याला गती देण्याविषयी चर्चा झाली असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

ऑस्ट्रेलिया खुल्या टेनिस स्पर्धेत महिला एकेरी गटाच्या अंतिम सामन्यात अमेरिकेच्या मॅडिसन कीजने गतविजेत्या बेलारूसच्या अरायना सबालेंकाचा ६-३, २-६, ७-५ असा पराभव करत आपल्या पहिल्या ग्रँड स्लॅम विजेतेपदाला गवसणी घातली. या पराभवामुळे सबालेंकाचं ऑस्ट्रेलिया खुल्या टेनिस स्पर्धेच्या सलग तिसऱ्या ऐतिहासिक विजेतेपदाचं स्वप्न पूर्ण होऊ शकलं नाही. या स्पर्धेच्या पुरुष एकेरी गटाच्या अंतिम फेरीत गतविजेत्या आणि प्रथम मानांकित इटलीच्या जॅन्निक सिन्नेरचा सामना उद्या द्वितीय मानांकित जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव्हशी होणार आहे. महिला दुहेरीत जेलेना ऑस्टापेन्को आणि हसीएह सु वेई जोडीची लढत उद्याच टेलर टाउन सेन्ड आणि कॅटरिना सिनिआ कोव्हा जोडीबरोबर होणार आहे.

**//<><><><><>//**